# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.२८/०६/२०१९

## दि. २७/०६/२०१९ रोजी दु.१२/०० वा.ते १६/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ४६४/१९,भादविक ३०२,१२०(ब),१०९,१४३,१४७,१४८,१४९,३२३,५०४, महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | जगन्नाथ काकडे,वय-५५,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपी** | एकुण आठ इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०६/२०१९ रोजी २३/५० वा. मच्छी मार्केट येरवडा,पुणे येथील सार्वजनिक शौचालया समोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मेव्हणा यांची अल्पवयीन मुलगी,वय-१५ वर्षे हिची नमुद इसमांपैकी एकाने छेड काढली होती. फिर्यादी यांचा मुलगा आदर्श व अनिकेत हे जाब विचारण्यासाठी ऋतिक साठे याचे घरी गेले. परंतु तो घरी मिळुन न आल्याने आदर्श व अनिकेत याने त्याचे घराचे लाईटचे मीटर बॉक्स व ड्रेनेजचे प्लॅस्टिक पाईप याची तोडफोड केली होती. त्यानंतर सदर इसमांनी आदर्श जगन्नाथ काकडे,वय-२४,रा.ईराणी मार्केटमागे शेलार चाळ,येरवडा,पुणे यास जीवे ठारण्याचे उद्देशाने त्यास भांडणे मिटविण्याचे बहाण्याने नमुद ठिकाणी बोलावुन घेवुन,नमुद इसमांनी हातातील धारधार हत्याराने फरशी,लाकडी फळी व दगडाने डोक्यात, तोंडावर व मानेवर वार करून,त्यास गंभीर जखमी करून जीवे ठार मारले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) अजय वाघमारे ९८२३८११६९६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ३७८/१९,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | रफिक काझी,वय-३५,रा.उरूळी देवाची,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील एक अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०६/२०१९ रोजी २१/३० वा.चे दरम्यान जेएपीएम कॉलेजचे पाठीमागील रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा टेम्पो नमुद ठिकाणावरून घेवुन जात असताना,नमुद इसमाने फिर्यादी यांचे टेम्पो समोर त्याची दुचाकी आडवी लावुन,फिर्यादी यांना तुझा टेम्पो माझे मोटार सायकलला घासला आहे. त्यामुळे फिर्यादी यांनी टेम्पोतुन खाली उतरून पाहिले असता,दुचाकीचे काही नुकसान झाले नव्हते. त्यानंतर सदर इसमाने फिर्यादी यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून,फिर्यादी यांचेजवळील त्यांचे कामाचे जमा झालेली ७,३००/- रोख रक्कम रूपये खिशातुन जबरदस्तीने काढुन घेतले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.डी.गायकवाड ९५९४८४२११७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**